महाराष्ट्र शासन

**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई**

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८

संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र.संवेशिवसं/एमएच-सीईटी२०१५/बीएएमएस व इतर/रिक्त जागा/नोटी-१८/१-अ, दिनांक :२७/१०/२०१५

# एमएच-सीईटी-२०१५ - नोटीफिकेशन

## (सुधारीत वेळापत्रक)

**शासकीय/ महानगरपालिका व शासन अनुदानित बी.ए.एम.एस./ बी.यु.एम.एस./ फिजीओथेरेपी/ ऑक्युपेशनलथेरपी/ बीएएसएलपी/ बी. (पी.ॲन्ड ओ.)/बी.एससी. नर्सिंग महाविद्यालयातील आणि बी.ए.एम.एस., फिजीओथेरपी आणि बी.एससी. नर्सिंग खासगी विनाअनुदानित महाविद्यालयातील रिक्त जागा भरणेबाबत.**

संचालनालयाच्या दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेचे सातत्य राखून सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ नंतर रिक्त राहिलेल्या प्रवर्गनिहाय जागांवर एमएच-सीईटी-२०१५ च्या नियमानुसार संबंधित महाविद्यालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेचे **सुधारीत** वेळापत्रक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे. सर्व संबंधित उमेदवार व महाविद्यालयांना कृपया खालील सुधारीत वेळापत्रकाची नोंद घ्यावी.

| क्र. | सूचना | वेळापत्रक |
|---|---|---|
| १. | महाविद्यालयनिहाय रिक्त जागांचा तक्ता संचालनालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध राहील. (www.dmer.org) | २७/१०/२०१५ |
| २. | विद्यार्थ्यांनी व्यक्तिशः (विद्यार्थी किंवा पालक) त्यांना हव्या असलेल्या महाविद्यालयात प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी. (एमएच-सीईटी-२०१५ च्या ऑनलाईन गुणपत्रिकेची आणि सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या छायाप्रतींसह) | २७/१०/२०१५ ते २८/१०/२०१५ |
| ३. | महाविद्यालयाने त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जांमधून गुणवत्ता यादी तयार करुन ती महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रकाशित करणे. | २९/१०/२०१५ (सकाळी ११.०० वाजता) |
| ४. | निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात रुजू होण्याचा कालावधी. | ३०/१०/२०१५ पर्यंत (सायं ५.०० वाजेपर्यंत) |
| ५. | **सदर मुदतीनंतर रिक्त राहीलेल्या जागावर दिनांक २९/१०/२०१५ रोजीच्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी. सदर प्रक्रियेच्या वेळी विद्यार्थ्यांकडे सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे आणि शैक्षणिक शुल्क असणे आवश्यक आहे.** | ३१/१०/२०१५ सकाळी ११.०० वाजता |
| ६. | **प्रवेशाचा अंतिम दिनांक** | **३१ ऑक्टोबर २०१५** |

विद्यार्थ्यांचे पात्रता निकष व नियम हे एमएच-सीईटी-२०१५ च्या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या नियमावली (एमएच-सीईटी २०१५ सामाईक प्रवेश परीक्षा नियमावली पुस्तिका आणि पसंतीक्रम अर्ज माहितीपुस्तिका) पुस्तिकांप्रमाणे रहातील. उपरोक्त महाविद्यालयांनी वर नमूद केलेल्या सूचना आणि वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

**सही/-**
**सक्षम प्राधिकारी व संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**